NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ०५.११.२०२६ गुरूवार

मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे हस्ते सायबर विभागातील उत्कृष्ट तपास करणारे पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा गौरव :–

मा. श्री. राजेंद्र दाभाडे, सह पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपूर शहर यांनी सायबर विभागातील कार्यरत उत्कृष्ट काम करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा आज दिनांक ०५.११.२०२६ रोजी पोलीस भवन येथे प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला.

नागपुर शहर पोलीस दलातील सायबर विभागामध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व अंमलदार यांनी गुन्ह्यांचा योग्य प्रकारे तपास करून सायबर गुन्हे उघडकीस आणले. तसेच, ऑनलाईन आर्थिक फसवणूकीचे प्रकरणामध्ये तातडीने कार्यवाही करून, गुन्हे प्रतीबंधासाठी उल्लेखनिय कामगिरी केली आहे. कर्तव्य बजावतांना त्यांनी दाखविलेली तत्परता, तांत्रीक कौशल्य, उत्कृष्ठ तपासकार्य व कर्तव्यनिष्ठा याची दखल घेवुन, उत्कृष्ठ सेवा बजावणाऱ्या अधिकारी व अंमलदाराचा मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपुर शहर यांनी त्यांचेहस्ते सर्वांना प्रशस्तीपत्रक व रोपटे देवुन, भविष्यात अधिक उत्कृष्ट काम करण्यासाठी प्रोत्साहीत केले.

याप्रसंगी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नागपुर शहर, मा. श्रीमती महक स्वामी पोलीस उप आयुक्त (सायबर), नागपुर शहर तसेच, ईतर अधिकारी व अंमलदार हजर होते.









(कामगिरी)

बेलतरोडी पोलीसांची कामगिरी :– जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०४.११.२०२६ चे २१.४० वा. ते २२.४५ वा. चे दरम्यान, बेलतरोडी पोलीसांचे पथक यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, न्यु मनिष नगर, मनोमय हॉटेल, रूम नं. ५०६ येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी आरोपी क्र. १) शेख शहजाद शेख सलीम, वय ३० वर्षे, रा. यासीन प्लॉट, मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपुर २) सुधिर चंद्रकांत जगताप, वय ४५ वर्षे, रा. राजापेठ बसस्टॉप, हुडकेश्वर, ३) कमर अली अहमद अली, वय ४५ वर्षे, रा. सिंधीबन, मोठा ताजबाग, सक्करदरा ४) आशुतोष प्रकाश गजभिये, वय ३१ वर्षे, ५) पप्पु मुकेश सारवान, वय ३५ वर्षे, ६) आदीत्य सुधीर मेश्राम, वय २५ वर्षे, ७) अविनाश भाऊराव उके, वय ४० वर्षे, ८) रितेश रत्नाकर कुंभार, वय ३६ वर्षे, सर्व रा. चंद्रमणी नगर, अजनी, ९) आकाश ब्रिजलाल रगडे, वय ३२ वर्षे, रा. रामेश्वरी, अजनी १०) सन्नी सुरेंद्र चव्हाण, वय २७ वर्षे, रा. कापलावस्ती, ईमामवाडा ११) कबीर उर्फ भोलानाथ लाल डकाह, वय ३८ वर्षे, रा. बोरकर नगर, ईमामवाडा १२) सतीष विष्णु अंबोणे, वय ५५ वर्षे, रा. फुले मार्केट झोपडपट्टी, धंतोली १३) श्रीकांत देवाजी भुजाडे, वय ४३ वर्षे, रा. अजनी चौक, धंतोली हे सर्वजण ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन हार–जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख ३०,०७०/–रू., ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण ३०,०७०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे बेलतरोडी येथे कलम ४, ५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. रविंद्र नाईकवाड, पोउपनि. अमोल शिंदे, ऋषीकेश कडुस, पोहवा. सचिन लाचरवार, सुहास, पोअं. विवेक श्रीपाद व प्रमोद यांनी केली.

(अकस्मात मृत्यु)

१) पोलीस ठाणे नविन कामठी :– दिनांक ०५.११.२०२६ चे ०२.३० ते ०३.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत आवडी बोगदा, लिहीगांव हायवे येथे ट्रॅक्टर पलटी झाल्याने, कामठी पोलीसांनी घटनास्थळी जावुन, लोकांचे मदतीने पलटी झालेला ट्रॅक्टर सरळ उभा केला. त्याखाली दबलेल्या ०३ ईसमांना जखमी अवस्थेत बाहेर काढुन, त्यांचेबाबत चौकशी केली असता, त्यांची नावे १) महेंद्रसिंग टप्पुलाल कोकोडे, वय ४० वर्षे २) धनराज सोमाजी मडावी, वय ३५ वर्षे ३) विजय कन्हैय्यालाल भलावी, वय ३५ वर्षे, तिघेही रा. विसापुर रयत, तह. कुरई, जि. शिवनी (मध्य प्रदेश) असे असल्याचे समजले. जखमींना उपचाराकरीता उपजिल्हा रूग्णालय, कामठी येथे नेले असत, उपचारादरम्यान डॉक्टरांनी महेंद्रसिंग कोकोडे यांना तपासुन मृत घोषीत केले. जखमी धनराज मडावी यांचा मेयो हॉस्पीटल व विजय भलावी यांचा उपचार मेडीकल हॉस्पीटल येथे सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी पोउपनि. हनुमंत नकाते ९६३७२४१८९८ यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे सदर :– दिनांक ०५.११.२०२६ चे ०७.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सदर हद्दीत बैरामजी टाऊन, छावनी, सदर, नागपुर येथील अर्नेजा हॉस्पीटल चे नविन बांधकामचे साईटवर ५ वे माळ्यावर मजुर काम करणारे ईसम नामे कुलदीप उत्तरसिंह कुशराम, वय २९ वर्षे, रा. गांव मोहगांव, तह. बरघाट, जि. शिवनी (मध्य प्रदेश) यांचा बिल्डींगवरून अचानक तोल जावुन, ते जमिनीवर खाली पडल्याने गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले. याप्रकरणी फिर्यादी महेश देवचंद पटले, वय २९ वर्षे, रा. खरबी टी–पॉईन्ट, वाठोडा, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सदर येथे सपोनि. नरेंद्र तायडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे पारडी :– दिनांक ०५.११.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पारडी हद्दीत, तलमले वाडी, मोकळ्या मैदानातील एका पडक्या घरातील पहील्या मजल्यावरील एका खोलीमध्ये एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाचे, ज्यांनी अंगात पिवळसर हाफ बाहीची टि–शर्ट, निळ्या रंगाची मळकट जिन्सपॅन्ट घातलेल्या वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे पारडी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोउपनि. सचिन जाधव यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे पारडी येथे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

(मिसींग)

१) पोलीस ठाणे एमआयडीसी :– फिर्यादी रजनिश केशवराव गावंडे, वय २७ वर्षे, रा. प्लॉट नं. ५१, सुरक्षा नगर, दत्तवाडी, वाडी, नागपूर यांनी पोलीस ठाणे एमआयडीसी येथे तक्रार दिली की, त्यांचे नातेवाईक नामे अमन सुरेश गावंडे, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. ४, सौदामिनी सोसायटी, जयताळा, एमआयडीसी, नागपुर हे दिनांक १३.१०.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पारडी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ८ इंच, केस–काळे, अंगात– पांढरा चौकडीचा शर्ट व काळा जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात. ओळख– उजव्या हातावर इंग्रजीत बाल्या नांव गोंदलेले आहे.

२) पोलीस ठाणे ईमामवाडा :– फिर्यादी बबिता अमीत अडबडीया, वय ३९ वर्षे, रा. बोरकर नगर, बारासिग्नल, शितलामाता मंदीर जवळ, ईमामवाडा, नागपुर यांनी पोलीस ठाणे ईमामवाडा येथे तक्रार दिली की, त्यांचे नातेवाईक नामे दिलीप सुखिराम सिक्करवार, वय ६२ वर्षे हे दिनांक १०.१०.२०२६ रोजी राहते घरून बेपत्ता झाले आहेत. त्याचा शोध घेतला असता, मिळून आला नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यास फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे ईमामवाडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–निमगोरा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट १ इंच, केस–काळे पांढरे, अंगात– शर्ट व पॅन्ट घातलेले आहे. भाषा– मराठी, हिंदी बोलतात. हातावर कविता–सुनिता असे नांव गोंदलेले आहे.


अमन


दिलीप

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. विशेष न्यायाधीश, (मकोका) कोर्ट तथा अति. सत्र न्यायाधीश–१ साहेब, नागपुर.	अप.क्र. ४२९/२०२६	कलम १०९(१), ३५१(३), ३५२, १८९(२), १९१(२), १९१(३), १९० भा. न्या.सं., सहकलम ३,७,२५,२७,२९ भा.ह.का., सहकलम ३(१)(ii), ३(२), ३(४) म.को.का–१९९९	**१)** शोयेब तय्यब खान वय २७ वर्षे **२)** असलम तय्यब खान वय ३० वर्षे, दोन्ही रा. जयसंतोषी मॉ हाऊसींग सोसा. रोड, दाभा, नागपूर **३)** प्रशांत उर्फ सोनु शंकर वासनिक, वय २७ वर्षे, रा. प्लॉट नं. ३२५, सोनबा नगर, वाडी नागपूर **४)** शेख अहिराज उर्फ राजा बॉन्ड शेख रियाज, वय २८ वर्षे, घर क्र. ३४८, नवा नकाशा, लष्करीबाग, पाचपावली, नागपूर	१८.११.२०२६

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

वाहतुक शाखेची प्रेसनोट

वाहतूक परिमंडळ सदर हद्दीत झिंगाबाई टाकळी ते गोधणी गाव (गोधणी रोड) पर्यंत रस्ता अरूंद असल्याने या भागात वाहतूकीची कोंडी होत असते. जड वाहनांचा आवागमनामुळे नमुद मार्गावर किरकोळ, गंभीर तसेच, प्राणांतीक अपघात होत आहेत. त्यामुळे या मार्गावर जड वाहनांवर प्रतिबंध घालने आवश्यक आहे. त्यामुळे जड वाहनांवर प्रतिबंध घालणेकरीता खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

- **झिंगाबाई टाकळी ते गोधणी गाव (गोधणी रोड) पर्यंत संपुर्ण मार्गावर सर्व प्रकारच्या जड वाहनांवर प्रतिबंध घालण्यात येत आहे.**

सदर अधिसूचना दिनांक ०६.११.२०२६ चे सकाळी ०६.०० वा ते रात्री १०.०० वा. पावेतो लागु करण्यात येत आहे. सदर अधिसुचना ही पुढील आदेशापर्यंत अमंलात राहील.

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/–
(आदित्य मिरखेलकर, भापोसे.)
पोलीस उप आयुक्त, वाहतुक,
नागपूर शहर

आदेश

(भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 कलम 163 अन्वये)

ज्याअर्थी माझ्या निदर्शनास असे आणुन देण्यात आले आहे की, दिनांक 06.11.2026 रोजी धनत्रयोदशी, दिनांक 08.11.2026 रोजी नरक चतुर्दशी दिपावली/लक्ष्मीपुजन, दिनांक 10.11.2026 रोजी बलिप्रतिपदा, दिपावली पाडवा, दिनांक 11.11.2026 रोजी भाऊबीज, दिनांक 14.11.2026 रोजी पांडव पंचमी याप्रमाणे दिवाळी सण साजरा होणार आहे.

ज्याअर्थी, दिवाळीच्या काळात सार्वजनिक ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, लोक मोठया प्रमाणात फटाके उडवतात व फोडतात, त्यामुळे रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या लोकांचे जिवीतास धोका निर्माण होतो आणि सार्वजनिक शांततेला बाधा निर्माण होते.

ज्याअर्थी, शहरातील पेट्रोल पंप, गॅस सिलेंडर गोडाऊन, केरोसीन तेलाचे डेपो, फटाक्याची दुकाने, ज्वालाग्राही पदार्थांचे डेपो, रासायनिक पदार्थांचे डेपो व दुकाने, हे ज्याठिकाणी वस्ती अगर बाजारपेठेत आहेत, तेथील स्थानिक लोकांकडून व्यापाऱ्यांकडून सदर ठिकाणाचे जवळ फटाके/रॉकेट इत्यादी फोडल्या गेल्यास फटाक्यांची ठिणगी पडून/उडून त्याव्दारे स्फोट होवून मोठया प्रमाणात आग लागल्यामुळे जीवित तसेच वित्तहानी होण्याची शक्यता असते.

त्याअर्थी वरील परिस्थितीचा विचार करून सार्वजनिक सुरक्षितता व सुव्यवस्थेच्या दृष्टीने मी, **विश्वास नांगरे पाटील, भा.पो.से., पोलीस आयुक्त, नागपूर शहर**, मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 कलम 163 अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून आदेश जारी करतो की,

1) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने शांतता व सुव्यवस्था राखण्याकरीता खालील नमूद ठिकाणापासुन 200 फुटांचे आत फटाके उडवण्यास मनाई आहे.
   1. पेट्रोल पंप
   2. गॅस सिलेंडर गोडाऊन
   3. केरोसीन तेलाचे डेपो
   4. फटाक्याची दुकाने
   5. ज्वालाग्राही पदार्थांचे डेपो
   5. रासायनिक पदार्थांचे डेपो

2) शाळा, कॉलेज, रुग्णालय, न्यायालय इत्यादी सार्वजनिक ठिकाणी जे शांतता झोन मध्ये येतात त्या परिसरात फटाके फोडण्यास मनाई आहे.

3) फटाक्याच्या लडी व असे फटाके जे मोठया प्रमाणात प्रदूषित हवा, आवाज, घन कचरा तयार करतात अश्या प्रकारचे फटाके फोडण्यास मनाई आहे.

4) कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने उडणारे दिवे/कंदील (Flying Lanterns) उडवण्यास मनाई आहे.

5) सर्व फटाके विक्रेते, दुकानदार, ठोक विक्रेते यांना सुचित करण्यात येते की, मा. हरीत लवाद यांचे OA-249/2020, dated 09/11/2020 तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई, नागपूर शहर यांचे पत्र क्र. MPCB /JD (APC) /TB-B /201110- FTS 011 dated 09/11/2020 चे आदेशानुसार नागपूर शहर हे मध्यम प्रकारच्या वर्गीकृत हवेचे प्रदुषणाचे शहर असल्याने फक्त ग्रिन फटाके (Green Crackers) विक्रीसाठी ठेवण्यात यावे.

6) पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 व त्या अंतर्गत तयार करण्यात आलेले ध्वनी प्रदुषण (नियम व नियमन) 2000 यामध्ये दिलेल्या निर्देशांचे पालन करावे.

7) मा. उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठ यांच्या दिनांक 23.09.2026 रोजीच्या आदेशानुसार सार्वजनिक रस्त्यावर फटाके फोडण्यावर सक्त मनाई आहे.

वरील आदेशाचे उल्लंघन करणारे व्यक्ती भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 223 अंतील तरतुदीनुसार कायदेशीर शिक्षेस पात्र राहील.

वरील आदेश दिनांक 06.11.2026 चे 00.01 वा. पासुन ते दिनांक 14.11.2026 चे 24.00 वा. पर्यंत अंमलात राहील.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक 05.11.2026 रोजी जारी करण्यात आला आहे.

ठिकाण :– नागपूर शहर
शिक्का :–

COMMISSIONER OF POLICE ★ NAGPUR ★

(विश्वास नांगरे पाटील, भा.पो.से.)
पोलीस आयुक्त
नागपूर शहर